महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.२८३/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४८ दिनांक ०२/०३/२०१३

विषय : सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ अनुसार 'भांडार मदतनीस' आणि 'ब्राडमा ऑपरेटर' या पदांकरिता उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ विहित करण्याबाबत.

.....

सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ अन्वये कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा कालावधीत उच्च वेतन श्रेणीचे प्रथम व द्वितीय लाभ देण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अनुसार ज्या कर्मचाऱ्यांची तद्र्थ म.रा.वि.मंडळ व मंडळाच्या विभाजनानंतर महावितरण कंपनीमध्ये अखंडित २८ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ मंजूर करण्याबाबतच्या सूचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

२. या अनुषंगाने कंपनीमध्ये लागू करण्यात आलेल्या सुधारित कर्मचारी मानंकानुसार 'भांडार मदतनीस' आणि 'ब्राडमा ऑपरेटर' या व्यपगत झालेल्या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीच्या तृतीय लाभ देण्यासाठी वेतनश्रेणी निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता. आता सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ चे सुधारपत्र क्र.१० दि.२२.११.१९८४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार संचालक (वित्त) यांनी संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) आणि कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन 'भांडार मदतनीस' आणि 'ब्राडमा ऑपरेटर' या पदी कार्यरत कर्मचाऱ्यांना सदर लाभ खालीलप्रमाणे मंजूर करण्यास मान्यता दिली आहे.

| पदनाम | सा.आ.क्र.७४ (क) चा तृतीय लाभ द्यावयाची वेतनश्रेणी |
|---|---|
| **भांडार मदतनीस**<br>रु.८०४०-१५५-८८१५-१८५-१०६६५-२२०-१५७२५ | रु.९३००-२९५-१०७७५-३२५- १४०२५-३६०-२५५४५ |
| **ब्राडमा ऑपरेटर**<br>रु.८४२५-१८५-९३५०-२२०-११५५०-२९५- १८९२५ | रु.१०५५५-३९०-१२५०५-५१०-१७६०५-५४०-३११०५ |

३. सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ व प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४, दिनांक २८.०७.२०१० मधील इतर तरतूदी अबाधित राहतील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Adm.Cir.F.N.283.3rd G.O.74.doc*
*02/03/2013*